सेवा निलंबन कालावधीचा निर्णय घेणे बाबत.(श्री.बाळासाहेब नाना आतकर सेवानिवृत्त तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी ग्रांमपंचायत भोरवाडी ता.अहिल्यानगर )

जिल्हा परिषद अहिल्यानगर
आदेश ग्रामपंचायत विभाग-ग्रांप ३ क्र 1434454
दिनांक /०५/२०२५
14.07.2025

संदर्भ :- १. या कार्यालयाची नोटीस क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/क्र.५३९०३२ दिनांक २० /०८/२०२४ ( सेवा निलंबन कालावधीच्या निर्णया बाबत )

२ . श्री.बाळासाहेब नाना आतकर सेवानिवृत्त तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत भोरवाडी पं.स.नगर यांचा खुलासा दिनांक ०५/०९/२०२४

३. महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील काळांतील प्रदाने) नियम १९८१ चे नियम ७२ चे (५) (७)

संदर्भ क्रमांक ०१ अन्वये श्री.बाळासाहेब नाना आतकर सेवानिवृत्त तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी ग्रांमपंचायत भोरवाडी पंचायत समिती अहिल्यागनर यांना दिनांक २२/०३/२०१६ ते दिनांक २०/०९/२०१६ अखेरचा सेवा निलंबन कालावधी हा सेवेच्या सर्व कारणांसाठी कामावर व्यतीत न केलेला कालावधी म्हणून का समजणेत येऊ नये? या बावतची नोटीस देण्यात आलेली आहे.

संदर्भ क्रमांक ०२ अन्वये श्री. बाळासाहेब नाना आतकर यांनी सदर प्रकरणी खुलासा सादर केला की,दोपारोप किरकोळ स्वरुपाचे होते.कोणत्याही प्रकारचा अपहार किंवा अर्थिक गैरव्यवहार अर्थिक अनियमितता असे कोणतेही आरोप नव्हते.शासनाचे कोणत्याही प्रकारचे अर्थिक नुकसान झाले नाही .मी अत्यंत प्रमाणिकपणे काम केलेले असुन नेहमीच कर्तव्यदक्ष राहुन काम केलेले आहे. शासनाच्या सर्व योजनांची प्रभावी अंमलवजावणी केलेली आहे.तेंव्हा विंनती की, दिनांक २२/०३/२०१६ ते दिनांक २०/०९/२०१६ हा सेवा निलंबन कालावधी सेवेच्या सर्व कारणासाठी कामावर व्यतीत केलेला कालावधी म्हणुन धरण्यात यावा.

श्री.बाळासाहेब नाना आतकर तालुका अहिल्यानगर यांचा खुलासा अंश:ता मान्य करण्यात येत असुन सेवानिवृत्ती कामी महाराष्ट्र नागरी सेवा सेवा (पदग्रहण अवधी स्वियेत्तर सेवा निलंबन व बडतर्फ यांचे काळांतीलप्रदाने) नियम १९८१ चा नियम ७२ चे (५) (७) मधील तरतूदीनुसार श्री.बाळासाहेब नाना आतकर सेवानिवृत्त तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी तालुका अहिल्यानगर यांचा दिनांक २२/०३/२०१६ ते दिनांक २०/०९/२०१६ अखेर सेवा निलंबित कालावधी हा कामावर व्यतीत केलेला कालावधी म्हणून ग्राह्य धरणेत यावा सदर आदेशाची नोंद संबधीतांचे सेवा पुस्तकात घेण्यात यावी. सदरचा आदेश जिल्हा परिषद अहिल्यागनर www.ahmednagarzp.gov.in चे संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेताक 202507140600090 असा आहे.

Signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 14-07-2025 20:25:26
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति- श्री.बाळासाहेब नाना आतकर सेवानिवृत्त तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी अहिल्यानगर
द्वारा :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती नगर अहिल्यानगर
प्रत - गट विकास अधिकारी पंचायत समिती नगर पुढील कार्यवाहीसाठी .